# मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण
## बैठक दिनांक २३/०१/२०२५
## इतिवृत्त

मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाची बैठक दिनांक २३/०१/२०२५ रोजी दुपारी ०३.३० वाजता, मा. अध्यक्ष, मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण तथा अपर मुख्य सचिव (परिवहन) यांचे अध्यक्षते खाली घेण्यात आली. सदर बैठकीस् खालील अधिकारी हजर होते.

| | |
|---|---|
| १) **श्री. संजय सेठी**<br>**अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन)** | **अध्यक्ष** |
| २) **श्री. विवेक भीमनवार**<br>**परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य** | **सदस्य** |
| ३) **श्री. अनिल कुंभारे**<br>**सह पोलीस आयुक्त (वाहतूक)** | **सदस्य** |
| ४) **श्री. भरत कळसकर**<br>**प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य)** | **सचिव** |
| ५) **श्री. रवी गायकवाड**<br>**प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पूर्व)** | **सचिव** |
| ६) **श्रीमतीहेमांगीनी पाटील**<br>**प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे** | **सचिव** |
| १०) **श्री अतुल आदे**<br>**प्रादेशिक परिवहन अधिकारी, वसई** | **सचिव** |
| ११) **श्री. आशुतोष बारकुल**<br>**उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण** | **सचिव** |
| १२) **श्री. सौरभ पवार**<br>**सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पश्चिम)** | |

**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीत सोबत जोडलेल्या विषयसूचीनुसार सर्व विषय मांडण्यात आले व सविस्तर चर्चा होऊन पुढिलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

| बाब क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| बाब क्र. ०१/प्रा.प.का, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम) ठाणे व पनवेल | दिनांक ०७/०३/२०२४ रोजीच्या मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणेबाबत. | **मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाची बैठक दिनांक ०७/०३/२०२४ रोजी घेण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यासाठी प्राधिकरणास सादर करण्यात आले. सदर बैठकीत सविस्तर चर्चा होऊन दिनांक ०७/०३/२०२४ रोजीचे बैठीकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले.** |
| बाब क्र. ०२ /प्रा.प.का, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम) ठाणे व पनवेल | मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि. ०७/०३/२०२४ रोजीच्या बैठकीत प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल. | **मुंबई महानगरक्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि. ०७/०३/२०२४ रोजीच्या बैठकीत प्राधिकरणाने घेतलेल्या निर्णयावर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीचे मा. प्राधिकरणाने अवलोकन करून तशी नोंद घेतली.** |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य), (पश्चिम), (पूर्व), ठाणे व पनवेल** | | |
| बाब क्र. ०३ / प्रा.प.का, मुंबई (मध्य/पूर्व/पश्चिम) ठाणे व पनवेल | मा. बी.सी.खुटआ समितीनेसादर केलेल्या अहवालातील शिफरशी व शासनाने मान्यता दिलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने टॅक्सी व ऑटोरिक्षा भाडेदर वाढीच्या सुत्रानुसार भाडेदरवाढ होण्याबाबत.<br>**<u>अ) काळी-पिवळी मीटरटॅक्सी भाडेदर सुधारणा.</u>**<br><br>**<u>ब - ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडेदर सुधारणा</u>** | **सन २०२२ च्या तुलनेत वाहनची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर ई बाबींमध्ये वाढ झाल्यामुळे पुढिलप्रमाणे भाडेदर सुधारणाकरण्यास मान्यता देण्यात आली आहे.**<br>**<u>अ) काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी)</u>**<br>**१. काळी-पिवळी मीटर टॅक्सी साठी पूर्वीचे प्रति कि.मी. रुपये १८.६६/- वरून रुपये २०.६६/- भाडेदरात वाढ करून सुधारणा करण्यास मान्यता दिली.**<br>**२. काळी-पिवळी मीटर टॅक्सी साठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रूपये २८/- वरून रुपये ३१/- भाडेदरात वाढ करून सुधारणा करण्यास मान्यता दिली.**<br>**३. कुलकॅबसाठी पूर्वीचे प्रति कि.मी. भाडे रुपये २६.७१/- वरून रुपये ३२.०५/- (२०%वाढीप्रमाणे) भाडेदर सुधारणा करण्यास मान्यता दिली.** |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | ४. कुलकॅबसाठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रुपये ४०/- वरून रुपये ४८/- (२०% वाढीप्रमाणे) भाडेदरात वाढ करून सुधारणा करण्यास मान्यता दिली.<br><br>ब) ऑटोरिक्षा (सीएनजी)<br>१. ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति कि.मी. भाडे रुपये १५.३३ वरून रुपये १७.१४/- भाडेदरात वाढ करून सुधारणा करण्यास मान्यता दिली.<br>२. ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रूपये २३/- वरून रूपये २६/- भाडेदरात वाढ करून सुधारणा करण्यास मान्यता दिली.<br><br>• उपरोक्त भाडेदर सुधारणा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील सर्व काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा (सीएनजी) यांना लागू राहील.<br>• उपरोक्त भाडेदर सुधारणा दिनांक ०१/०२/२०२५ पासून लागू होईल.<br>• जे टॅक्सी व ऑटोरिक्षा परवानाधारक सुधारीत भाडेदरानुसार भाडेमिटरची रिकॅलीब्रेशन करून घेतील त्या ऑटोरिक्षा / टॅक्सींना ही भाडेवाढ लागू होईल.<br>• भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन दिनांक ०१/०२/२०२५ पासून दिनांक ३०/०४/२०२५ पर्यंत करून घेणे आवश्यक आहे.<br>• भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन होईपर्यंत सुधारीत अधिकृत टॅरिफकार्ड दिनांक ३०/०४/२०२५ पर्यंतच अनुज्ञेय राहील.<br>• विहित मुदतीत भाडे मीटरचे रिकॅलीब्रेशन न केल्यास, संबंधित काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा चालक / मालकास मा. प्राधिकरणाच्या दिनांक |

| | | |
|---|---|---|
| | | २०/१२/२०२१ रोजीच्या बैठकीतील निर्णय क्र. २२/२०२१ नुसार मुदत समाप्ती नंतरच्या प्रत्येक दिवसाच्या विलंबासाठी विभागीय दंडात्मक शुल्क आकारण्याचा निर्णय दिनांक ०१/०५/२०२५ पासून लागू होईल.<br><br>उपरोक्त प्रमाणे काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा भाडेदर सुधारणा करण्यास मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाने मान्यता दिली.<br>(निर्णय क्र. ०१/२०२५) |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे** | | |
| बाब क्र. ०४ / प्रा.प.का, ठाणे | परिवहन सेवा टाणे महानगरपालिकेच्या वातानुकुलित प्रवासी भाडेदरात बदल करणेकरिता मा. प्राधिकरणाची मंजूरी मिळणेबाबत. | **सदर बाब सविस्तर प्रस्तावासह पुढिल बैठकीस सादर करण्याचे निर्देश मा. प्राधिकरणाने दिले.** |
| बाब क्र. ०५/ प्रा.प.का, ठाणे | मिरा भाईदंर महानगरपालिकेच्या वातानुकुलित व सर्वसाधारण प्रवासी भाडेदराच्या प्रस्तावास मा.मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाची मंजुरी मिळणेबाबत.. | **सदर बाब सविस्तर प्रस्तावासह पुढिल बैठकीस सादर करण्याचे निर्देश मा. प्राधिकरणाने दिले.** |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य)** | | |
| वाब क्र. ०६ / प्रा.प.का, मुंबई (मध्य) | बृहन्मुंबई विदयुत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) ६ टप्पा प्रवासी वाहतूक परवान्याचे नुतनीकरण करणेबावत. | **मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८९ नुसार बृहन्मुंबई विदयुत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) ६ टप्पा प्रवासी वाहतूक परवान्याने -<br>१. पी.एसटी.एस २१/सी/मुंबई (१५० बसेससाठी)<br>२. पी.एसटी.एस ०९/सी/मुंबई (३०० बसेससाठी)<br>३. पी.एसटी.एस १३/सी/मुंबई (३०० बसेससाठी)<br>४. पी.एसटी.एस २०/सी/मुंबई (५०० बसेससाठी)<br>५. पी.एसटी.एस ४९/सी/मुंबई(५०० बसेससाठी)<br>६. पी.एसटी.एस १८/सी/मुंबई (१०० बसेससाठी)<br>वरीलप्रमाणे एकूण ६ टप्पा वाहतूक** |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | **परवाने नुतनीकरण करण्यास मा. प्राधिकरणाने मान्यता दिली.**<br>**(निर्णय क्र. ०२/२०२५)** |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई** | | |
| बाब क्र. ०७ / प्रा.प.का, वसई | मे. आर. जे. विरार मोटर्स. विरार (पुर्व) ता. वसई जि.पालघर या संस्थेस ऑटोरिक्षा टॅक्सी मिटर टेस्टिंग सेंटर म्हणून मान्यता देणेबबात. | **मे. आर. जे. विरार मोटर्स, विरार (पुर्व) ता. वसई जि.पालघर या संस्थेस ऑटोरिक्षा टॅक्सी मिटर टेस्टिंग सेंटर म्हणून मान्यता देण्यासाठीचा प्रस्ताव मा. प्राधिकरणाने अमान्य केला.**<br>**तसेच मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण कार्यक्षेत्रातील ऑटोरिक्षा / टॅक्सी मिटर टेस्टिंग खाजगी सेंटर बाबत संपुर्ण कामकाजाचा आढावा घेऊन अहवाल त्वरित प्राधिकरणास सादर करण्याच्या सूचना मा. प्राधिकरणाने दिल्या.**<br>**(निर्णय क्र. ०३/२०२५)** |
| **प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य/पश्चिम/पूर्व), बोरीवली, ठाणे, कल्याण.** | | |
| बाब क्रमांक ०८/ प्रा.प.का, मुंबई (मध्य/पश्चिम/पूर्व), बोरीवली, ठाणे, कल्याण. | मान्यता दिलेले टॅक्सी स्टॅण्ड/शेअर-ए-टॅक्सी स्टॅण्ड / ऑटोरीक्षा स्टॅण्ड / शेअर-ए-ऑटोरिक्षा स्टॅण्ड /मुंबई - पुणे टॅक्सी स्टॅण्ड माहितीस्तव प्राधिकरणा समोर सादर करणेबाबत.<br>**<u>अ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य)</u>**<br>मुंबई-पुणे ४५ टॅक्सीसाठी मान्यता देण्यात आलेले टॅक्सी स्टॅण्ड प्राधिकरणासमोर माहितीस्तव सादर करणेबाबत.<br><br>**<u>ब) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम)</u>**<br>मान्यता दिलेल्या मीटर व शेअर-ए-ऑटोरिक्षा स्टॅंड प्राधिकरणासमोर माहितीस्तव सादर करणेबाबत.<br><br>**<u>क) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व)</u>**<br>अ. शेअर-ए-ऑटोरिक्षा स्टॅंडला मान्यता देणेबाबत (एकूण १).<br>ब. मीटर टॅक्सी स्टॅंडला मान्यता देणेबाबत (एकूण २).<br>क. मीटर टॅक्सी स्टॅंडची मान्यता रद्द | **<u>अ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य)</u>**<br>मुंबई-पुणे टॅक्सी स्टॅण्ड ४५ टॅक्सीकरिता (दादर परिसरात).<br><br>**<u>ब) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम)</u>**<br>अ. ऑटोरिक्षा एकूण १६ स्टॅंड.<br>ब. शेअर-ए-ऑटोरिक्षा चे एकूण ०५ स्टॅंड.<br><br>**<u>क) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पूर्व)</u>**<br>अ. मीटर टॅक्सी एकूण ०२ स्टॅंड.<br>ब. शेअर-ए-ऑटोरिक्षा चे एकूण ०१ स्टॅंड.<br>क. मीटर टॅक्सी स्टॅंड - (ख्वाजा गरीब नवाज, अदानी पोल क्र.UJD/०४३०४८, शिवाली नगर जंक्शन, पी.एल. लोखंडे मार्ग, मानखुर्द-घाटकोपर लिंक रोडच्या दक्षिण वाहिनीच्या कॉर्नर लगत लजीज हॉटेलजवळ, मुंबई शिख पराठा कॉर्नरसमोर, मानखुर्द, गोवंडी, मुंबई-४०००४३) **मान्यता रद्द.** |

Scanned with CamScanner

| | | |
|---|---|---|
| | करणेबाबत.<br><br>**ड) प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली**<br>मान्यता दिलेल्या मीटर ऑटोरिक्षा स्टँडला/ शेअर-ए- ऑटोरिक्षा स्टॅण्ड प्राधिकरणासमोर माहितीस्तव सादर करणेबाबत. (एकूण ८).<br><br>**इ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे**<br>टाणे शहरात मान्यता दिलेल्या महिला ऑटो रिक्षाकरिता चालकांकरिता महिला विशेष ऑटो रिक्षा स्टॅण्ड माहितीस्तव सादर करणेबाबत..<br><br>**ई ) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण**<br>रिक्षा स्टँडला मंजुरी देणेबाबत. | **ड) प्रादेशिक परिवहन कार्यालय, बोरीवली**<br>अ. ऑटोरिक्षा एकूण ०५ स्टँड.<br>ब. शेअर-ए-ऑटोरिक्षा चे एकूण ०३ स्टँड.<br><br>**इ) प्रादेशिक परिवहन कार्यालय, ठाणे.**<br>अ. ऑटोरिक्षा एकूण २५ स्टँड.<br><br>**ई ) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण**<br>अ. ऑटोरिक्षा एकूण २३ स्टँड.<br><br>**वरीलप्रमाणे मान्यता दिलेल्या व मान्यता रद्द केलेल्या काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षा स्टॅण्डच्या माहितीचे मा. प्राधिकरणाने अवलोकन करून तशी नोंद घेतली.** |
| **मा. अध्यक्ष यांचे मान्यतेने आयत्या वेळी सादरकरण्यात आलेले विषय.** | | |
| बाब क्रमांक ०९ / प्रा.प.का, ठाणे | वाहन क्रमांक MH-०४-JH-२५५६ वाहन मालक श्री. जावेद मोहम्मद अन्सारी यांचा परवाना रद्द करणेबाबत. | **वाहन क्रमांक MH-०४-JH-२५५६ वाहन मालक श्री.जावेद मोहम्मद अन्सारी यांचा परवाना रद्द करणेबाबत मा. प्राधिकरणाने मान्यता दिली.<br>(निर्णय क्र. ०४/२०२५)** |

(संजय सेठी)
**अध्यक्ष**
**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण तथा**
**अपर मुख्य सचिव, गृह विभाग (परिवहन)**

(विवेक भीमनवार)
**सदस्य**
**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण तथा**
**परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य**

(अनिल कुंभारे)
**सदस्य**
**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण तथा**
**सह पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई**

(भरत कळसकर)
**सचिव**
**मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण तथा**
**प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य)**

Scanned with CamScanner